# भाजपच्या 'राष्ट्रीय एकीकरणा'बाबतचे प्रश्न

*सुदृढ निवडणुकीय राजकारणात व्यक्ती व राष्ट्रहित यांच्यात देवाणघेवाण अपेक्षित आहे, चढाओढ नव्हे.*

भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि त्याचे मित्रपक्ष प्रचारमोहिमांमध्ये राष्ट्रवादाच्या विशिष्ट संकल्पनेवरच भर देत आहेत. पुलवामा हल्ला होईपर्यंत या संकल्पनेचं स्वरूप सैनिकी व लढाऊ होतं. भाजपच्या या 'राष्ट्रवादा'च्या राजकारणामध्ये लोकशाही मतभिन्नतादर्शकांना शत्रू ठरवलं जातं, त्यामुळे भारत आणि त्याचा 'शत्रू देश' असलेला पाकिस्तान यांच्या संदर्भातली मांडणीच देशांतर्गत पातळीवरही केली जाते. राष्ट्राच्या लढाऊ प्रतिमेला सहाय्य होईल असं काम काही हिंदू वृत्तवाहिन्या व छापील माध्यमं करत आहेत. वार आणि पलटवार किंवा बडा हमला अशी सैनिकी परिभाषा ही माध्यमं वापरत आहेत. एका उपग्रहाला पाडण्यासाठी क्षेपणास्त्र पाठवण्यासंबंधी पंतप्रधानांनी अलीकडेच एक नाट्यमय घोषणा केली, त्यातून या सैनिकी शब्दसाठ्यात आणखी भर पडली. सार्वत्रिक निवडणुकांचे पडघम वाजत असल्याच्या या काळामध्ये या सर्व घडामोडींनी नैतिक जोरजबरदस्तीचं वळण घेतलं आहे. भाजपचे सदस्य वेगवेगळ्या मार्गाने जी विधाने करत आहेत, त्यातूनही हे स्पष्ट होतं : तुम्ही भाजपला मत दिलं नाहीत, तर भारताचं विभाजन करू पाहणाऱ्यांना तुम्ही मत दिल्यासारखं असेल. खरं तर काँग्रेसच्या रूपात देशांतर्गत शत्रू निर्माण करण्यासाठी भाजप उतावीळ झाला आहे. काँग्रेसचा निवडणुकीय जाहीरनामा राष्ट्रविरोधी आहे, अशी निवडक 'टीका' करणाऱ्या भाजपच्या प्रवक्त्यानेही हाच उतावीळपणा उघड केला. किंबहुना, केंद्रातील भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने राष्ट्रवादाच्या तयार काठीचा वापर करून सर्व लोकशाही मतभिन्नतेला मौनात ढकलायचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.

दुसऱ्या बाजूला, पाकिस्तानसोबतच्या लढाऊ संबंधांच्या चौकटीत भारतीय राष्ट्रवादाची व्याख्या करायचाही भाजपचा प्रयत्न सुरू आहे. निवडणुकांच्या काळात मात्र आपण पाकिस्तानची चिकित्सा करत असल्याचं दाखवलं जातं. भाजपच्या निवडणुकीय प्रचारमोहिमेसंदर्भात तीन कळीचे प्रश्न समोर येतात.

एक, राष्ट्रीय एकीकरणाच्या एकाच कथनावर भर देणं आणि निवडणुकीय जागृतीसाठी तार्किकतेचे मार्ग अवलंबण्याऐवजी मतदारांच्या भावनिकतेला आवाहन करण्याचा मार्ग पत्करणं, ही निवड भाजपने का केली? दोन, मतदारांनी कोणत्या गोष्टीला प्राधान्य देणं भाजपला अपेक्षित आहे– वास्तवापेक्षा कल्पित रंग भरलेल्या राष्ट्रीय एकीकरणाला, की कोणत्याही राजकीय पक्षाच्या सौजन्याशिवाय वा राष्ट्रवादी मंजुरीशिवाय संघर्षरत राहिलेल्या समुदायांमधील मतदारांना जगता येईल अशा राष्ट्राला? आणि शेवटी, व्यक्तिगत हिताचा त्याग करण्याची भाजपची मागणी मतदार अंमलात आणतील का? भाजपच्या आतापर्यंतच्या सत्तेमुळे निर्माण झालेल्या अस्तित्वलक्ष्यी समस्यांकडे दुर्लक्ष करून किंवा त्या विस्मृतीत ढकलून राष्ट्राच्या अमूर्त संकल्पनेवर तर्कशुद्ध व्यक्ती विश्वास ठेवतील का?

या वर्षीच्या निवडणुकीय प्रचारमोहिमेमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (रालोआ) लढाऊ राष्ट्रवादाच्या भावनिक संसाधनांचा अतिरिक्त वापर करणं, किंवा आपल्या नेत्यांसाठी सहानुभूती निर्माण करणं, किंवा

‘दुखावलेल्या हिंदूपणा’वर भर देणं– असे मार्ग अवलंबणं भाग पडतं आहे. २०१४ साली पंतप्रधान जनधन योजनेखाली प्रत्येक खातेधारकाला १५ लाख रुपये देण्याची आश्वासनं देण्यात आली, शिवाय लाखोंना रोजगार पुरवण्यात येतील अशाही घोषणा झाल्या होत्या, पण त्याचीच पुनरावृत्ती आता करता येणार नाही. त्यामुळे रालोआने हा मार्ग पत्करला आहे. रालोआने २०१९मधील निवडणुकांसाठीच्या ‘अजून अप्रकाशित निवडणुकीय जाहीरनाम्या’त ही आश्वासनं वाढवून नोंदवायचा प्रयत्न केला तर अशा पोकळ आश्वासनांचा मतदारांवर काही परिणाम होणार नाही. दोन, पक्षाने या आश्वासनांची पुनरावृत्ती करायचा प्रयत्न केला, तर आश्वासन ही संकल्पनाच क्षुल्लक पातळीवर आणल्यासारखं होईल. हे कोणत्याही पक्षाबाबत खरं आहे, कारण आश्वासन पूर्ण करण्यात अपयश आलं तर त्यातील नैतिक मूल्य कमी होतं. रोजगारासारख्या अनेक मुख्य क्षेत्रांमध्ये रालोआ सरकारने निराशाजनक कामगिरी केली, त्यामुळे भाजपच्या निवडणुकीय प्रचारमोहिमेने उघडपणे पक्षपाती वळण घेतलं. आता मतदारांनी ‘राष्ट्रीय एकीकरणा’साठी आपल्याला मतं द्यावीत, अशी भाजपची व त्याच्या मित्रपक्षांची अपेक्षा आहे.

परंतु, व्यापक व समावेशक राष्ट्रवादाचा दृष्टिकोन या आवाहनामध्ये आलेला नाही. राष्ट्रवादाची भाजपची मांडणी राष्ट्र व नागरिकांमधील देवाणघेवाणीच्या संबंधांवर आधारलेली नाही. जमावी हिंसा, स्वातंत्र्यविरोध, भय आणि चिंता अशा भयंकर व सामाजिकदृष्ट्या विभाजनवादी समस्यांकडे लक्ष न देता आपल्या राष्ट्रीय एकीकरणाच्या कथनावर लोकांनी विश्वास ठेवावा, अशी भाजपची अपेक्षा आहे.

वास्तविक, या विशिष्ट निवडणुकांच्या संदर्भात निश्चलनीकरण, वस्तू व सेवा कर, रोजगाराबाबतची फोल आश्वासनं, आणि अर्थातच दलितांविरोधातील जातीय अत्याचार व अल्पसंख्याकांवरील हिंसक हल्ले यांचा फटका बसलेले मतदार स्वतःच्या व्यक्तिगत व सामाजिक हितसंबंधांना प्राधान्य देतील. राष्ट्रामधील वास्तवात आपल्याला कशी वागणूक मिळते, यावरून हे लोक राष्ट्राच्या संकल्पनेचं मूल्यमापन करतील.

त्यामुळे रालोआने आखलेल्या भावनिक चौकटीमध्ये मतदार अडकणार नाहीत; निराळ्या प्रकारच्या भावनिक बंधनांमध्ये कायमचं अडकून पडायचा पर्याय ते स्वीकारण्याची शक्यता आहे. बाजारपेठेच्या चंचलतेपासून सुरक्षितता, रोजगाराची संसाधनं निर्माण केली जातील अशी राज्यसंस्थेकडून अपेक्षित असलेली हमी, विस्थापनापासून सुरक्षा आणि जमावाकडून हिंसेची भीती वा जातीय अत्याचारी लोकांचं भय यांपासून मुक्ती, अशा घटकांद्वारे राष्ट्राच्या चौकटीमध्ये या लोकांचाही सहभाग असतो. सामाजिकदृष्ट्या प्रतिसादक्षम व मानवी संवेदना असलेली राज्यसंस्था बहुविधतेच्या व वैविध्याच्या संदर्भात राष्ट्राची कल्पना उभी करेल. लोकांमधील विभाजनकारी जाणीव घट्ट करू पाहणाऱ्या विभाजनवादी शक्तींचा प्रभाव नष्ट करतील अशा संस्था निर्माण करण्याची जबाबदारी कोणत्याही सत्ताकांक्षी पक्षावर असणार आहे. राष्ट्रीय एकीकरणाची ही बहुधा सर्वांत सर्जनशील संकल्पना असेल. ●


## वर्गणी / लेख पाठवणे /पत्रव्यवहाराचा **नवा पत्ता**

परिवर्तनाचा वाटसरू, ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११, भ्र. ७७७६९०२२६७, ७०२८२०२०९२

# असुरक्षित निवडणूक आयोग

*मतदारांचा गैरवापर करण्याच्या कावेबाज प्रकारांवर उपाय करण्याची पुरेशी क्षमता तरी आहे का?*

देशातील लोकशाही संस्थांचं आरोग्य आणि जतन २०१९मधील लोकसभा निवडणुकांच्या निकालावर अवलंबून आहे. स्वतःसकट लोकशाही संस्थांचा बचाव करण्यासाठी 'स्वतंत्र व न्याय्य' निवडणुका घेण्याचं प्रचंड मोठं काम भारतीय निवडणूक आयोगाला पार पाडायचं आहे. हे काम गुंतागुंतीचं आहे, कारण यातील काही संस्थांच्या कामकाजाचा गैरवापर नवीन स्वरूपात होतो आहे आणि हे स्वरूप अजून पूर्णतः आकळलेलं नाही. परिणामी, निवडणूक आयोग असहाय होऊन अखेरीस पक्षपाती भूमिकेत घसरण्याचा मोठा धोका आहे.

पीएम नरेंद्र मोदी या चरित्रपटाच्या प्रदर्शनावरून अलीकडेच वाद निर्माण झाला, तेव्हा निवडणूक आयोगाने कटाक्षाने अनिर्णायक भूमिका टिकवून ठेवली. 'मोदी: जर्नी ऑफ अ कॉमन मॅन' ही दहा भागांची वेबमालिकाही प्रदर्शनाच्या मार्गावर आहे. यापूर्वी २०१४ व २०१७मध्येही मोदींचं गौरवीकरण करणारे प्रचारकी चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या घटना घडल्या होत्या. अशा चित्रपटांमध्ये मोदींविषयी अवाजवी आदर दाखवलेला असतो, परंतु, हे व्यक्तीपूजन भारतीय जनता पक्षालाही (भाजप) पाठिंबा मिळवून देत असतं. यातून संबंधित व्यक्तीला आणि त्याच्या पक्षाला उच्च स्थान दिलं जातं. अशा प्रकारच्या धडधडीत गैरहाताळणीची स्वतःहून दखल घेणं निवडणूक आयोगाला का शक्य झालेलं नाही? आयोगाने तयार केलेल्या आदर्श आचारसंहितेमध्ये अशा प्रकारच्या मतदारांच्या गैरवापराचा मुद्दा गांभीर्याने घेतला जातो का? दखल घेतलीच, तरी या गैरवापराचं मोजमाप कसं केलं जाईल?

मोदींची प्रचारमोहीम २०१४ साली भाजपच्या विजयासोबत संपली नाही. महत्त्वाच्या मुद्द्यांवर राष्ट्राला संबोधित करतानाही पंतप्रधान नाट्यमय सादरीकरणच करताना दिसते, आणि तो त्यांच्या परिणामकारक प्रचारमोहिमेचा भाग होता. पंतप्रधान कार्यालयाने एकदाही पत्रकार-परिषद घेतली नाही वा चर्चा आयोजित केली नाही. आधीच्या सरकारांप्रमाणे व्यूहरचना वा अर्थशास्त्र यांची दुरावा वाढवणारी भाषा विद्यमान सरकारने बाजूला सारली आहे. या सरकारने सूक्ष्म स्वरूपात हाताळणी करताना लोकांची दैनंदिन वापरातील भाषा वापरली. उदाहरणार्थ, 'मन की बात' करताना पंतप्रधान स्वतःला 'सेवक' किंवा 'चौकीदार' असं संबोधतात किंवा निश्चलनीकरणाला मान्यता मिळवण्यासाठी राष्ट्रीय दूरचित्रवाणी वाहिनीवर अश्रूही ढाळतात, तेव्हा लोकांना त्यांच्याबद्दल सहानुभूती ठेवणं भाग पडतं. देश, इथल्या समस्या, विकासाचा प्रश्न, अशा सर्व गोष्टींकडे राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकारच्या चष्म्यातून पाहाणं आता लोकांच्या अंगवळणी पडलं आहे, अशा वेळी अशा नैतिक गैरहाताळणीचं मोजमाप कसं ठेवणार? पण सरकारचा हा 'दैनंदिन' अवतार म्हणजे काळजीपूर्वक घडवलेली राजकीय व्यूहरचनाच आहे, हे लोकांपासून लपून राहिलेलं नाही. परंतु, जोपर्यंत धर्म, व्यवसाय वा नैतिकता या संदर्भातील आपले कळीचे व्यक्तिगत हितसंबंध सरकारशी मिळतेजुळते आहेत, तोवर लोक घटनात्मक मूल्यांच्या पायमल्लीकडे दुर्लक्ष करायला तयार आहेत.

सरकारी यंत्रणेने योजलेल्या व अंमलात आणलेल्या गैरहाताळणीची व्याप्ती किती आहे याचा अंदाज बांधण्यात निवडणूक आयोग उघडच अपुरा ठरत आहे. प्रत्येक वेळी आपण 'या प्रकरणात लक्ष घालू' असं आश्वासन देऊन आयोग स्वतःचं अंग मोकळं करून घेताना दिसतो : नमो टीव्ही या वाहिनीबद्दलचे तपशील विचारणं, एअर इंडियाला कारणे दाखवा नोटीस पाठवणं,

रेल्वे मंत्रालयाकडून उत्तर मागणं, आणि आपली जबाबदारी केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळावर ढकलणं, एवढ्याच कृतींवर आयोग समाधान मानतो आहे. या व इतर संस्था कमी-अधिक प्रमाणात आदर्श आचारसंहितेला टाळत आहेत, यावरून 'मोदी ब्रँड'च्या सर्वव्यापीपणाचे संकेत मिळतात.

निवडणूक आयोगाचं वर्तन पक्षपाती वाटायला लागलं आहे. निवडणुकीय स्पर्धेतील विषमता पाहिली की आयोगाच्या वाजवीपणाबद्दल घेण्यात आलेल्या शंका विशेष गंभीर ठरतात. सत्ताधारी पक्षाच्या हातात संसाधनं प्रचंड प्रमाणात एकत्र आली आहेत, आणि पूर्णतः सामाजिक विभाजनवादी व विखारी प्रचारमोहिमेवरच या पक्षाने भर द्यायचं ठरवलेलं दिसतं. सशस्त्र दलांना 'मोदी जी की सेना' असं संबोधणाऱ्या योगी आदित्यनाथ यांना निवडणूक आयोगाने कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे आणि मोदींना पंतप्रधान म्हणून पुन्हा निवडून द्यावं या राजस्थानातील राज्यपालांच्या जाहीर आवाहनासंदर्भात आयोगाने राष्ट्रपतींना पत्र लिहिलं आहे. परंतु, लोकानुनय, धर्म व भांडवल यांच्यातील संगनमतामुळे निवडणूक आयोगाचे आचारसंहितेची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न प्रतिबंधात्मक ठरण्याची शक्यता नाही. मोदींच्या प्रचाराला याच संगनमताद्वारे खतपाणी घातलं जातं.

प्रत्यक्ष शासन आणि वक्तृत्वपूर्ण प्रचार यांच्यातील सीमारेषा सातत्याने पुसट होत आहेत, त्यामुळे गैरहाताळणीचं स्वरूप, स्रोत आणि व्याप्ती यांना कावेबाजपणे अस्पष्ट केलं जातं. वक्तृत्व ही कृती गैरहाताळणी मानता येते का? चित्रपट व दूरचित्रवाणी उद्योग आणि छापील माध्यमं यांच्या कामकाजावर निवडणूक आयोगाने लक्ष ठेवायला हवं का? आचारसंहिता धुडकावून लावली जाते, त्यावर उपाय करण्यासाठीचं पहिलं पाऊल म्हणून प्रचारी माध्यमांचं वैविध्य समजून घ्यायला हवं. मतदारांची गैरहाताळणी करण्याच्या विविध स्वरूपांना समजून घेताना व त्यावर उपाय करताना वापरल्या जाणाऱ्या चौकटीमध्ये आयोगाने बदल करायला हवा. ●

## 'न्याय्य' अधिकार

*सार्वजनिक संस्था नागरी अधिकारांविषयी संवेदनशील असतील तरच कार्यक्षम उत्पन्न हस्तांतरण शक्य.*

देशातील २० टक्के सर्वाधिक गरीब कुटुंबांना किमान उत्पन्नाची हमी मिळेल अशा 'न्यूनतम आय योजने'चं (न्याय) आश्वासन काँग्रेस पक्षाने निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दिलं आहे. यासंबंधीचं श्रेय काँग्रेसला द्यायला हवं. गरीबांना किमान आर्थिक कर्तेपणाची हमी मिळावी यासाठी कल्याणकारी कार्यक्रम पार पाडण्याची नैतिक आवश्यकता या घोषणेमुळे पुन्हा मध्यवर्ती स्थानी आली आहे. सत्ताधारी सरकारने कल्याणकारी योजनांसाठी पद्धतशीररित्या सोयीच्या पायाभूत सुविधांची निवड केली आणि सामाजिक सुरक्षितता जाळं खंगायला सोडून दिलं. त्या पार्श्वभूमीवर हे आश्वासन लक्षणीय आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये या आश्वासनाच्या विश्वसनीयतेबद्दल चर्चा वेगळ्या दिशेने वळली आहे- किमान उत्पन्न हमीकडे गरीबी भत्ता वा लाभ म्हणून पाहू नये तर 'सुरक्षा' म्हणून पाहावं अशी जबाबदारी 'सर्वसामान्य माणसा'वर देण्यात आली आहे. परंतु, अशा राजकीय आश्वासनांच्या बाबतीत अनेकदा कधी 'सामाजिक सुरक्षा' तर कधी 'भत्ता' असे शब्द परस्पर पर्यायी असल्याप्रमाणे वापरले जातात. यातून परिणामतः उत्तरदायित्वाची यंत्रणा क्षीण होते. जगण्याची प्रतिष्ठा आणि न्याय यांच्या संदर्भातील नागरिकांच्या अधिकारांची खात्री देण्यात लोकनियुक्त सरकार अपयशी ठरलं, तर त्याला जाब विचारण्यासाठी ही यंत्रणा

सहाय्यभूत ठरते. पण सामाजिक सुरक्षा व भत्ता यांच्या राजकीय महत्त्वाविषयी साशंक असलेल्या सर्वसामान्य मनांच्या असंवेदनशीलतेचं वा भाबडेपणाचं प्रतिबिंब, एवढाच या अर्थनिर्णयनाचा गाभा आहे का? की, मानवी जीवन व प्रतिष्ठा यांच्या प्रेरणेला सर्वत्र कमी लेखणाऱ्या सेवा पुरवठा रचनेमध्ये घडलेलं हे अर्थनिर्णयन आहे?

हमी, सहाय्य, अथवा भत्ता यांपैकी कोणताही शब्द वापरला तरी त्यामध्ये कमी-अधिक प्रमाणात (राज्यसंस्थेकडून) आश्रयदातृत्वाचा अर्थ जोडलेला असतो. कितपत आश्रयदातृत्व नैतिकदृष्ट्या स्वीकारार्ह असतं- विशेषतः लाभार्थींचं जीवन व उपजीविका यांच्या मूलभूत अधिकारांशी संबंधित सेवांचा प्रश्न असेल तेव्हा ही स्वीकारार्हता कशी ठरते? निर्वाह उत्पन्नाची 'हमी' सरकारने दिल्यामुळे, उपजीविकेच्या पातळीवरील कळीच्या निर्णयप्रक्रियेचा ताण दूर सारला जातो, त्यातून गरिबांच्या जगण्याची गुणवत्ता लक्षणीयरित्या सुधारते, असं संशोधनातून दिसून आलं आहे. परंतु, विखंडित, उतरंडीची रचना असलेल्या संस्थात्मक व्यवस्थांद्वारे अशा योजनांची अंमलबजावणी होत असेल तर 'अधिकार' वा दायित्व या गोष्टी लाभार्थींच्या 'लाभा'च्या वा विशेषाधिकाराच्या असल्यासारखं चित्र उभं केलं जातं, आणि पक्षपाती हेतूंनी यामध्ये सहज फेरफार करता येतात. लक्ष्यकेंद्री सुरक्षा जाळी योजनांचा आपला पूर्वानुभव असाच राहिलेला आहे. लाल फितीचे स्तर आणि त्याच्याशी संबंधित भुरट्या चोऱ्या यांमुळे अशा योजनांशी निगडित गरीबी निर्मूलनाचे लाभ सर्वसाधारण पातळीच्या वर जात नाहीत, असं उपलब्ध पुराव्यावरून सूचित होतं. काँग्रेसची प्रस्तावित किमान उत्पन्न हमी योजना सार्वत्रिक नाही तर 'लक्ष्यकेंद्री' आहे, त्यामुळे गरिबांच्या जीवनात सुधारणा घडवण्याबाबत ती कितपत प्रभावी ठरते, याबद्दल शंका आहे. सेवा पुरवठ्याच्या इतिहासातील चढ-उतार लक्षात घेता सुरक्षा जाळ्यांचा (इथे- किमान उत्पन्न हमी) विचार लोकांच्या दृष्टिकोनामध्ये केवळ 'भत्ता' स्वरूपातच राहातो, आणि तसं होण्यापासून सुटका नाही.

हे खरं असलं तरी, ('अच्छे दिन'च्या संदर्भात) 'वेटिंग फॉर गोदो' या नाटकासारखी समाजाची अवस्था झालेली असताना काँग्रेसची न्याय योजना आशेचा एक किरण घेऊन येते. गोदो काही अशा प्रकारचा जाहीरनामा घेऊन आलेला नाही किंवा येणार नाही. पण आपल्या काय मिळू शकेल हे जाणून घेऊन निवड करण्याची संधी या निमित्ताने मिळाली आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील किमान उत्पन्न हमीची घोषणा पूर्व-अनुमान बांधणारी व आगाऊ राजकारण करणारी आहे का, यावर वाद घालत बसण्याऐवजी तिची व्यवहार्यता व अंमलबजावणी या संदर्भात चिकित्सा व्हायला हवी. पाच कोटी कुटुंबांची लक्ष्य लोकसंख्या कशाचा आधारावर काढली आणि प्रति कुटुंब ७२,००० रुपये वार्षिक उत्पन्न सहाय्याची प्रस्तावित पातळी निश्चित करताना कोणते आर्थिक आडाखे बांधले गेले? या योजनेची व्याप्ती कितीही असली तरी वित्तीय तुटवडा तीन टक्क्यांवर ठेवता येईल या गृहितकामागील गणित काय? केंद्र व राज्यं यांच्यातील खर्चविषयक जबाबदारीचं प्रारूप काय असेल? आंध्र प्रदेश व ओडिसा इथे आधीपासूनच थेट रोख हस्तांतरण योजना लागू आहेत, मग ही राज्यं सदर प्रारूपाचं अनुसरण का करतील? या योजनेची कार्यक्षम अंमलबजावणी व्हावी यासाठी काही संस्थात्मक सुधारणा केल्या जातील का? गरीबीविरोधी व अंशदानाच्या संदिग्ध कार्यक्रमांची जागा ही योजना अखेरीस घेईल का?

अशा महागड्या कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रायोगिक चाचणीनंतरच व्हावी, हे समजण्यासारखं आहे, आणि उपरोल्लेखित काही प्रश्नांची उत्तरं अंमलबजावणीनंतरच मिळण्याची शक्यता आहे. परंतु अशा प्रकारचा वजनदार जाहीरनामा केवळ नाममात्र राजकारणापुरताच राहू नये, याची खातरजमा मतदारवर्गाने करायला हवी. या

आश्वासनाचे काही ठोस परिणाम साधले जायला हवे असतील, तर संसाधनांविषयीचं वास्तवदर्शी चित्र मांडायला हवं. अशी योजना कधीही अंमलात आली तरी त्यासंबंधीचा दमसास दिरंगाईच्या मर्यादेपर्यंत ताणला जाणार नाही, याची काळजी संबंधित राजकीय पक्षाने घेणं आवश्यक असतं. कारण, न्याय लांबवणं हे न्याय नाकारण्यासारखंच असतं. परंतु, या दोन्ही प्रकरणांमध्ये सर्व संबंधित पातळ्यांवरील मनोवृत्तीमध्ये मूलभूत बदल व्हावे लागतील. सर्वसामान्य लोकांनी व सरकारने (संभाव्य वा विद्यमान) हे लक्षात घ्यायला हवं की, एक- न्याय व प्रतिष्ठा हे अधिकार आहेत, भत्ते किंवा लाभ नाहीत, दोन- हे अधिकार काही विशेषाधाकारी स्थानाशी संबंधित नाहीत, किंवा आकांक्षाकारक लक्ष्य ठरवणारेही नाहीत, तर लाभार्थींचे कायदेशीर दावे आहेत. ●

## दहशतवाद आणि कायद्याचा मार्ग

*राष्ट्रीय तपास संस्थेने तपासाच्या आंतरराष्ट्रीय प्रमाणकांशी सुसंगत कृती करण्याची नितांत गरज आहे.*

हरयाणातील पानिपतजवळ २००७ साली झालेल्या समझोता एक्सप्रेस बॉम्बस्फोटातील अरोपींना अलीकडेच निर्दोष मुक्त करण्यात आलं. या स्फोटात ६८ प्रवाशांचा मृत्यू झाला, त्यातील ४४ जण पाकिस्तानी नागरिक होते. या संदर्भातील ताज्या न्यायालयीन निकालावर टोकाच्या विरोधी प्रतिक्रिया आल्या आहेत. भारतीय जनता पक्षाने (भाजप) या निर्णयाला 'ऐतिहासिक' संबोधलं आहे. दुसऱ्या बाजूला, पाकिस्तानने या निर्णयाला न्यायाचं विडंबन असं संबोधलं आहे. या प्रकरणात चौकशी करणाऱ्या राष्ट्रीय तपास संस्थेच्या (नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी : एनआयए) विश्वासार्हतेवरही याचा परिणाम झाला आहे, किंबहुना हा या घटनाक्रमातील अतिशय चिंतेचा भाग आहे. एनआयए न्यायालयाने नमूद केलेल्या निरीक्षणांमध्येही या चिंतेचं प्रतिबिंब पडलं आहे. सरकारी पक्षाने सादर केलेल्या पुराव्यामध्ये 'भलीमोठी छिद्रं' होती आणि स्वीकारार्ह पुराव्याअभावी या 'भ्याड हिंसक कृत्या'बाबत कोणालाही शिक्षा होऊ शकलेली नाही, अशी टिप्पणी विशेष एनआयए न्यायालयातील न्यायाधीशांनी केली. निवाडा देताना आपल्या मनात 'खोल दुःख आणि संतापा'ची भावना असल्याची कबुलीही न्यायाधीशांनी कागदोपत्री दिली.

मुक्तता झालेल्या चार आरोपींमध्ये नबा कुमार सरकार ऊर्फ स्वामी असीमानंद यांचाही समावेश आहे. ऑक्टोबर २००७मध्ये झालेल्या अजमेर बॉम्बस्फोट खटल्यासंदर्भात विशेष एनआयए न्यायालयाने २०१८ साली असीमानंदांना निर्दोष मुक्त केलं होतं आणि नऊ जणांचा जीव घेणाऱ्या मे २००७मधील मक्का मस्जीद बॉम्बस्फोटांसंदर्भात हैदराबाद न्यायालयानेही त्यांना दोषमुक्त केलं. या दोन्ही प्रकरणांमध्ये एनआयएच तपास करत होती आणि यामध्येही आरोपीविरोधातील आरोप सिद्ध करण्यात सरकारी पक्षाला अपयश आल्यामुळे त्याची निर्दोष मुक्तता झाली. मक्का मशिदीच्या संदर्भात हैदराबाद पोलिसांनी पहिल्यांदा मुस्लिमांना अटक केली होती आणि नंतर त्यांना सोडून देण्यात आलं, पण दरम्यानच्या काळात कोठडीत त्यांच्यावर अत्याचार झाल्याचे आरोपही करण्यात आले. महाराष्ट्रातील २००६सालच्या मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याची वाटही अशीच होती, फक्त त्यामध्ये तपाससंस्था एनआयए ही नव्हती.

मुस्लीम समुदाय आणि भारतातील कायदा अंमलबजावणी व सुरक्षा संस्था यांच्यामधील परस्पर विश्वासात मोठी घट झाली आहे. गेला बराच काळ मानवी हक्क कार्यकर्ते, वकील व पुरोगामी माध्यमं या

मुद्द्याकडे लक्ष वेधत आहेत. अयोध्येत बाबरी मशीद पाडण्यात आल्यावर मुंबईमध्ये उसळलेल्या १९९२-९३च्या दंगलींसंदर्भात चौकशी करणाऱ्या श्रीकृष्ण आयोगाचा अहवाल, त्यानंतरचे दहशतवादासंबंधीचे अनेक खटले आणि दंगली, यांमधून आपलं खलचित्रण झालं आणि या प्रकरणांमध्ये मनमानी पद्धतीने आपल्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करण्यात आलं, अशी स्पष्ट भावना मुस्लीम समुदायाच्या मनात निर्माण झाली आहे.

या सर्व प्रकरणांमागचं- आत्ताच्या संदर्भात समझोता एक्सप्रेस बॉम्बस्फोटांमागचं- सत्य जाणून घेण्याचा अधिकार जनतेला आहे आणि अशा घडामोडींमध्ये पहिल्यांदा या अधिकाराचा बळी जातो. यात काही साधे पण महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात : ६८ निरपराध भारतीयांचा व पाकिस्तान्यांचा जीव घेणारा बॉम्ब तिथे कोणी ठेवला? भारत व पाकिस्तान यांच्यात काही सहमती निर्माण होऊ नये, कितीही धोकादायक ठरलं तरी त्यांनी एकमेकांशी संघर्ष करत राहावं, अशी ठाम भूमिका कोणत्या शक्तींची होती? दोन देशांमधील नागरिकांना एकमेकांना भेट देणं सुकर व्हावं, या उद्देशाने ही समझोता एक्सप्रेस सुरू झाली. परंतु, या बॉम्बस्फोटामुळे माणसांना यातना झाल्याच, शिवाय दोन देशांमधील वैरभावात वाढ झाली. या प्रकरणात झालेला तपास आणि त्यावर देण्यात आलेला निवाडा यांमधून पीडितांच्या कुटुंबीयांचं दुःख थोडंसंही कमी झालेलं नाही. उलट, या प्रकरणातून 'भारतीय न्यायालयांच्या विश्वासार्हतेचं ढोंग उघड होतं' आणि आपल्यावर आरोप करणं हा भारताचा दुटप्पीपणा आहे, असं म्हणण्याची संधी पाकिस्तानला यातून मिळाली.

गेल्या काही वर्षांमध्ये 'हिंदुत्ववादी' दहशतवादी संशयितांचा संबंध असलेल्या खटल्यांच्या बाबतीत एनआयएने मवाळ भूमिका घ्यायला सुरुवात केल्याचे अनेक आरोप भारतात झालेले आहेत. एनआयएच्या तपास कौशल्यांविषयी विशेष न्यायालयाने केलेल्या टिप्पणीनंतर अशा आरोपांना आणखी जोरच मिळेल. दहशतवादाचा प्रतिकार करण्यासंदर्भात एनआयएची भूमिका मध्यवर्ती स्वरूपाची आहे, त्यामुळे ही परिणामकारक व व्यावसायिक दर्जाचं काम करणारी संस्था आहे, असा विश्वास सर्व नागरिकांना वाटणं गरजेचं आहे. समझोता एक्सप्रेस बॉम्बस्फोटांनंतरच्या १२ वर्षांच्या कालखंडामध्ये २२४ साक्षीदारांपैकी ५१ जणांनी आपली साक्ष फिरवली आणि एका प्रमुख आरोपीचा खून झाला. या स्फोटांसबंधीचा तपास करणाऱ्या विशेष पथकाचं नेतृत्व केलेल्या हरयाणातील उच्चपदस्थ (आता निवृत्त) पोलीस अधिकाऱ्याने सार्वजनिकरित्या उघडपणे असं म्हटलं होतं की, या स्फोटांसंबंधी आरोपी असलेल्या हिंदू अतिरेक्यांविरोधात आपल्याकडे ठोस पुरावा आहे. तरीही चार आरोपींना निर्दोष मुक्त करणाऱ्या निर्णयाविरोधात याचिका दाखल केली जाणार नाही आणि या स्फोटाच्या प्रकरणात नवीन चौकशीही केली जाणार नाही, असं केंद्रीय गृह मंत्री म्हणाल्याचं प्रसारमाध्यमांमधून प्रसिद्ध झालं आहे.

अशा परिस्थितीत, पुढे कृती करायला नकार देणाऱ्या सरकारचे टीकाकार स्वाभाविकपणे गोध्रा ट्रेन जळीत प्रकरणाकडे निर्देश करतील. या प्रकरणातील (आरोपी मुस्लिमांविरोधात) सुनावणी आणि निवाडा अतिशय वेगाने झाला होता. मुंबईतील १९९२-९३च्या दंगलींमधले आरोपी (यात अनेक पोलीस अधिकारी व हिंदू होते) आणि १९९३ साली शहरात झालेल्या बॉम्बस्फोटांमधील आरोपी (मुख्यत्वे मुस्लीम) यांच्याबाबतच्या कारवाईसंदर्भातही अशीच तुलना करण्यात आली आहे.

'निःस्वार्थी व निर्भय प्रयत्न करून भारतातील नागरिकांचा विश्वास जिंकणं', हे एनआयएच्या स्वघोषित उद्दिष्टांमधील एक उद्दिष्ट आहे. तर, तपास संस्था म्हणून एनआयएची विश्वसनीयता पुन्हा मिळवायला हवी आणि यासाठी आवश्यक पावलं सरकारने उचलायला हवीत. ●

## डिजिटल प्रचारमोहिमांवर देखरेख

*समाजमाध्यमांवरील प्रचाराबद्दलची निवडणूक आयोगाची भूमिका समभूमीची तजवीज करणारी नाही.*

आगामी लोकसभा निवडणुकांसाठीचा प्रचार हा बहुधा आत्तापर्यंतचा सर्वाधिक 'डिजिटल' प्रचार असेल. अनेक पक्ष आता समाजमाध्यमं, मोबाइल ॲप्स, ऑनलाईन चर्चास्थळं आणि सामूहिक संदेशन अशा डिजिटल साधनांचा वापर व अनेकदा गैरवापर करत आहेत.

गेल्या आठवड्यामध्ये काही समाजमाध्यम मंचांनी 'इंटरनेट अँड मोबाइल असोसिएशन ऑफ इंडिया'च्या सोबतीने आणि भारतीय निवडणूक आयोगाशी चर्चा करून 'ऐच्छिक आचारसंहिता' प्रकाशित केली. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांची पायमल्ली करणाऱ्या आणि पैसे देऊन प्रसिद्ध केलेल्या निवडणुकीसंबंधीच्या जाहिरातींवर देखरेख ठेवली जाईल आणि कारवाईसुद्धा केली जाईल, असं फेसबुक, गुगल, ट्विटर व इतर मंचांनी स्पष्ट केलं. निवडणूक प्रक्रियेचं 'स्वतंत्र व न्याय्य स्वरूप दूषित करण्या'साठी या मंचांचा गैरवापर होणार नाही, याची तजवीज या आचारसंहितेद्वारे होईल, असा संबंधितांचा दावा आहे.

गेल्या दशकभरामध्ये समाजमाध्यमं केवळ नेटवर्किंगची साधनं राहिलेली नाहीत, तर नागरिकांच्या पररस्परसंवादाचा महत्त्वाचा मार्ग बनली आहेत. यातून लोकशाहीच्या कामकाजाचा मार्ग बदलून नागरिकांचं सबलीकरण व शिक्षण होण्याची आणि मुक्ती मिळण्याची शक्यता निर्माण होते. परंतु, केम्ब्रिज अनॅलिटिकाने केलेल्या खुलाशानुसार, लाखो लोकांची वैयक्तिक माहिती याच साधनांच्या द्वारे राजकीय लाभासाठी वापरली जाते. आपल्या देशामध्ये माहितीच्या गैरवापराचा धोका आहेच, शिवाय बनावट बातम्याही मोठ्या प्रमाणावर आहेत आणि आशयउत्पादक संकेतस्थळंही 'वृत्त संस्था' असल्याचा देखावा उभा करू लागली आहेत. समाजमाध्यम मंच सबलीकरण करणारे असू शकतात, पण पैसा व सत्ता यांच्यानुसार त्यांच्या उपलब्धतेमध्ये फरक पडत असल्यामुळे हे अजूनही विषम मंच आहेत.

राजकीय पक्षांच्या प्रचारमोहिमांवरील खर्चावर चाप बसवण्यासंबंधीची चर्चा निवडणूक आयोगाने ऑगस्ट २०१८मध्ये बोलावलेल्या एका सर्वपक्षीय बैठकीमध्ये झाली होती. राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांच्या खर्चामध्ये समतोल राहावा आणि निवडणुकीच्या निष्पत्तीवर पैशाचा प्रभाव पडण्याची शक्यता कमी करावी, या उद्देशाने हा मुद्दा चर्चेत आला होता. सदर बैठकीमध्ये भारतीय जनता पक्ष (भाजप) या एकाच पक्षाने अशा निर्णयाला विरोध केला. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनुसार, फेसबुकवर होणारा भाजपचा खर्च (यात 'भारत के मन की बात' व 'नेशन विथ नमो' यांसारख्या भाजपसमर्थक फेसबुक-पानांचाही समावेश आहे) इतर पक्षांपेक्षा बऱ्याच मोठ्या प्रमाणात पुढे गेला आहे. भाजप व त्याच्याशी संलग्न पानांनी फेब्रुवारी २०१९मध्ये २.३७ कोटी रुपये खर्च केल्याच्या बातम्या आल्या होत्या, म्हणजे त्या महिन्यात पक्षाने केलेल्या एकूण खर्चातील ५० टक्क्यांहून अधिक रक्कम या समाजमाध्यम मंचावर खर्च झाली. याच काळात प्रादेशिक पक्षांचा फेसबुकवरील एकत्रित खर्च १९.८ लाख रुपये इतका होता, तर काँग्रेस व त्याच्याशी संलग्न पानांवर १०.६ लाख रुपये खर्च झाले. समाजमाध्यमांवरचा बहुतांश खर्च प्रभावक विपणनाद्वारे होतो. यामध्ये राजकीय पक्षांशी संबंधित विख्यात व्यक्ती दीर्घ व खर्चिक मोहीम राबवतात. यातील बहुतांश प्रचारमोहिमा रोख मानधनावर चालू असतात, त्यामुळे पैशाच्या व्यवहाराचा माग सिद्ध करणं अवघड आहे. राजकीय पक्षांच्या वतीने जाहिराती प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तींना शोधणं जवळपास अशक्य आहे. व्हॉट्स-ॲपसारखे मंच इनक्रिप्टेड संदेशनाची सुविधा देतात, त्यांवरून राजकीय जाहिरातीही

पसरवल्या जातात, त्यामुळे देखरेखीची प्रक्रिया आणखी गुंतागुंतीची होते.

या संदर्भात, भारतीय निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उमटवणं आवश्यक आहे. आयोगाने ऑक्टोबर २०१३मध्येच– २०१४च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी– प्रचारामधील समाजमाध्यमांच्या वापराची दखल घेतली होती. त्या वेळी 'निवडणूक प्रचारातील समाजमाध्यमांच्या वापरासंदर्भात आयोगाच्या सूचनां'मध्ये केवळ 'उमेदवार, राजकीय पक्ष, माध्यमं आणि निवडणूक निरीक्षक' यांच्यापुरत्याच या सूचना होत्या. आता या घडामोडींचं एक वर्तुळ पूर्ण झालं आहे. त्या वर्षीपासून दरम्यानच्या काळात अनेक राज्य विधानसभा निवडणुका झाल्या आहेत, तरीही त्या सूचनांमध्ये काही बदल झालेले नाहीत. उमेदवारांनी, पक्षांनी व इतरांनी समाजमाध्यमांचा वापर कसा करावा यासंबंधी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वं आखून देण्यात आलेली नाहीत, किंवा अशा मंचांवरील जाहिरातींसाठी पक्षांकडून खर्च केल्या जाणाऱ्या बेसुमार पैशावर काही मर्यादाही घालण्यात आलेली नाही.

अलीकडेच प्रकाशित झालेली ऐच्छिक आचारसंहिता पुरेशीही नाही आणि तिला उशीरही झाला आहे. निवडणुकीच्या प्रचारांदरम्यान पैसे देऊन केलेल्या जाहिरातींवर देखरेख ठेवताना समाजमाध्यम कंपन्या आणि भारतीय निवडणूक आयोग यांचा परस्परांशी संवाद कसा राहील, यासंबंधीचं मार्गदर्शन तेवढं त्यात करण्यात आलं आहे. अशा जाहिराती प्रसिद्ध करणारा मंच म्हणून समाजमाध्यम कंपन्यांना मुळात आदर्श आचारसंहिता लागू असायला हवी. उमेदवार, राजकीय पक्ष व त्यांच्या समर्थकांकडून जाहिराती स्वीकारताना त्यांनी आचारसंहितेचं पालन करायला हवं. समाजमाध्यमांवरील जाहिरातींसाठी पूर्व-प्रमाणपत्र घेणं आवश्यक आहे आणि त्यासाठी देण्यात आलेल्या पैशांच्या बाबतीत पारदर्शकता असावी, असे आदेश निवडणूक आयोगाने २०१३ सालच्या सूचनांमध्येच दिले होते. या सूचनांचं पालन करण्यासाठी आवश्यक पावलं मात्र आत्ता उचलली जात आहेत, त्यातही ऐच्छिक निवडीचा पर्याय आहे. यातून निवडणूक आयोगाचा सुस्तपणा आणि डिजिटल मंचांकडे व निवडणुकीय प्रक्रियेतील त्यांच्या भूमिकेकडे पाहण्याचा कालबाह्य दृष्टिकोन दिसतो. परिणामी, ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारच्या निवडणुकीय प्रक्रियांमध्ये सर्वांना समभूमी मिळेल, याची खातरजमा करण्यात आयोगाला अपयश आलं आहे.

डिजिटल अवकाश भौतिक, सामाजिक व राजकीय अवकाशांपासून अलग पडलेला नसतो. तो अवकाश सुटा कार्यरत असतो, असं मानणं शहाणपणाचं ठरणार नाही. डिजिटल मंच आणि तंत्रज्ञान लोकशाही व्यवस्थांवर कशा पद्धतीने परिणाम करतात आणि पर्यायाने निवडणूक प्रक्रियेच्या सचोटीवरही त्याचा परिणाम कसा होतो, याची उलटतपासणी करण्याची गरज आपण दुर्लक्षिली आहे, त्यामुळे सध्या आपण 'ग्रे झोन'मध्ये वावरतो आहोत. जगातील सर्वांत मोठ्या निवडणुका होत असताना केवळ एक महिना आधी 'ऐच्छिक' आचारसंहिता लागू करणं म्हणजे समाजमाध्यम कंपन्यांचा जनसंपर्काचा निष्फळ प्रयत्न आहे. आदर्श स्थितीत, गेल्या काही वर्षांच्या कालावधीत निवडणूक आयोगाने समाजमाध्यमांविषयीचा पुरेसा व सूक्ष्म आकलन ठेवणारा ज्ञानसाठा जमा करायला हवा होता. वेगाने उत्क्रांत होणाऱ्या डिजिटल अवकाशाचा अदमास बांधण्यासाठी हे ज्ञान उपयुक्त ठरलं असतं. २०२४ साली समाजमाध्यमं आणि निवडणुका कशा असतील, याचा अंदाज बांधायचा असेल, तर निवडणूक आयोगाने यासंबंधी कृती करण्याची वेळ आली आहे. ●

# संशोधकीय मनांचं शासकीयीकरण

*ज्ञानसंपन्न सरकारने संशोधनाच्या वाटा विस्तारायला हव्यात, आकसायला तर अजिबात नकोत.*

उच्चशिक्षण संस्थांमध्ये सखोल आणि वैविध्यपूर्ण विचाराला चालना देण्याचा कोणताही कल गेल्या पाच वर्षांत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने दाखवलेला नाही. संशोधकांना मुक्त मनाने काम करता येईल अशा विद्यापीठाची संकल्पना या सरकारच्या शिक्षणविषयक अधुदृष्टीला मानवणारी नाही. विद्यापीठाच्या असा संकल्पनेला उलटवण्याचे, त्यांची स्वायत्तता कमी करण्याचे आणि संशोधकीय मनांना क्षीण करण्याचे अनेक प्रयत्न या काळात झाले आहेत. अलीकडेच सर्व केंद्रीय विद्यापीठांचे कुलगुरू, मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोग (युनिव्हर्सिटी ग्रान्ट्स कमिशन : यूजीसी) यांच्या १५ डिसेंबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये एक ठराव मंजूर करण्यात आला, त्यानुसार या विद्यापीठांनी 'राष्ट्रीय प्राधान्यक्रमा'चं पालन करणं अभिप्रेत आहे. केरळ केंद्रीय विद्यापीठासारख्या काही विद्यापीठांनी तर असाधारण तत्परता दाखवत या ठरावाची अंमलबजावणी करायला घेतली. संशोधनाच्या विषयांना अंतिम रूप देताना विविध अकादमिक संस्थांचा सहभाग अपेक्षित असतो, परंतु अशा चर्चात्मक प्रक्रियांना क्षीण करण्याचा प्रयत्न या ठरावाद्वारे करण्यात आला आहे. संशोधन कसं आकार घेतं याच्या मूळ लोकशाही अंगालाच कमकुवत करू पाहणारा असा ठराव बौद्धिकतेविरोधी जाणारा आहे.

या ठरावात नमूद करण्यात आलेल्या अटी स्पष्टपणे संशोधक अभ्यासकांवर राष्ट्राची विशिष्ट संकल्पना लादणाऱ्या आहेत. या संकल्पनेमध्ये राष्ट्र म्हणजेच सरकार असल्याचा चुकीचा समज करून दिला जातो, आणि त्यातील सर्व दऱ्या, विषमता, अन्याय व रोष यांना वगळलं जातं. मग कोणताही भिन्न दृष्टिकोन किंवा कोणत्याही स्वरूपाची मतभिन्नता आपोआपच राष्ट्राला– म्हणजे या चुकीच्या संकल्पनेनुसार सरकारला– विध्वंसक असल्याचा शिक्का मारला जातो. अशा राष्ट्रीय प्राधान्यक्रमाच्या कक्षेत न येणाऱ्या घटकांचा इतिहास व सामाजिक वास्तव 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग' वगळण्याचं काम सुरू आहे. संशोधनावरही अशा मर्यादा आल्या, तर बहुसंख्याकवादी दृष्टिकोनाला विरोध करणं अवघड होऊन बसेल. शिवाय, राष्ट्रवादाची अनेक संभाषितं आहेत आणि राष्ट्राच्या परस्परविरोधी व भिन्न संकल्पना आहेत, ही मांडणी विस्मृतीत जाईल.

चौकटीबाहेरच्या संशोधनाला नाउमेद करणारे आणि प्रमाणीकरणाला न जुमानणारे अनेक अडथळे विद्यमान विद्यापीठ व्यवस्थेमध्ये आधीपासूनच उपस्थित आहेत. आता 'अप्रस्तुत क्षेत्रां'मधील संशोधनाला नाउमेद करण्यासाठी वाढीव अटी लादल्यामुळे 'सुरक्षित' न मानलं जाणारं संशोधन विद्यापीठांमधील विभागच थोपवून धरण्याची शक्यता निर्माण होते. उदाहरणार्थ, निश्चलनीकरणाचे 'लाभ' किंवा स्वच्छ भारत अभियानासाठी मोजावी लागलेली सामाजिक-पर्यावरणीय किंमत, अशांचं विश्लेषण करणारे संशोधन विषय 'सुरक्षित' मानले जाणार नाहीत. संशोधनामध्ये प्रस्तुतता सर्वांत महत्त्वाची नसते, तर एखादा विषय संशोधकासाठी, अकादमिक समुदायासाठी आणि त्याचप्रमाणे व्यापक समाजासाठी किती अर्थपूर्ण आहे, हे महत्त्वाचं असतं. संशोधन हे संशोधकासाठी अर्थपूर्ण असायला हवं. आदर्श स्थितीत संशोधकाचं मन आणि जीवन यांना चालना देणाऱ्या प्रश्नांमधून हे विषय निपजत असतात. त्यांनी हा ध्यास घेतलेला असतो आणि प्रश्न विचारणं हे या प्रवासातील पहिलं व निर्णायक पाऊल असतं. कुतूहल आणि अभिव्यक्तीचा प्रयत्न त्यात गरजेचा असतो, कष्ट असतात, स्वतःच्या

सर्जनशीलतेची, चिकित्सकतेची आणि चिंतनपर संवेदनशीलतेची जोपासना यात केली जाते. तर, कोणतेही आणि कितीही प्रश्न विचारता येतील अशा वातावरणाची गरज संशोधकाला असते.

आधीच तयार केलेल्या विषयांच्या यादीतून संशोधकांना 'निवड' करावी लागेल, असे आदेश देणारा ठराव संशोधनाचा मूळ उद्देशच संपवणारा आहे. उपलब्ध आहे त्या पलीकडचं, 'जाणून घेण्याजोगं' मानलं जातं त्या पलीकडचं जाणून घेण्याची खटपट करणं, आणि विद्यमान अभ्यासविश्वातील मौनाची दखल घेऊन ताजे प्रश्न उपस्थित करणं, हा यामागचा उद्देश असायला हवा. बाजारपेठीय किंवा सरकारी हितसंबंधांनुसार किंवा अगदी प्रचलित अकादमिक लहरीनुसार चमच्याने विषय भरवले गेले आणि आदेश दिले गेले, तर संशोधन आत्माच हरवून बसेल. नेहमीचे, सुरक्षित व प्रस्थापित रचनेला अनुसरणारे विषय मांडायचे असतील तर मुळात संशोधनाची गरजच काय? शिवाय, केवळ तत्कालीन चिंतांना प्रतिसाद देण्याची क्षमता एवढंच संशोधकीय विद्यापीठांचं मूल्य नसतं, तर वर्तमानाच्या मर्यादेपलीकडे जाणाऱ्या संकल्पनांना या विद्यापीठांनी सामोरं जाणं अपेक्षित असतं.

केरळ केंद्रीय विद्यापीठाने काढलेल्या परिपत्रकासारख्या कृतींमुळे सार्वजनिक विद्यापीठांवर लादण्यात आलेल्या भयग्रस्ततेत भरच पडते आणि सरकारने मंजूर केलेल्या निवडक क्षेत्रांपुरताच संशोधकीय निधी मर्यादित राहील, असे संकेत त्यातून मिळतात. यापूर्वी ६० विद्यापीठांना व महाविद्यालयांना 'स्वायत्त' घोषित करण्यात आलं; तेव्हाही विद्यापीठांचा निधी कमी करून त्यांनी स्वतःची संसाधनं स्वतः मिळवावीत, असा यूजीसीचा उद्देश असल्याचे संकेत मिळाले होते. अशा परिस्थितीत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणं आणि कॉर्पोरेटायझेशनचा मार्ग पत्करणं, असे पर्याय विद्यापीठांना अवलंबावे लागणं भाग पडतं. विविध सामाजिक विज्ञान केंद्रांना मिळणाऱ्या निधीमध्ये करण्यात आलेली कपात, हे त्याच दिशेने टाकलेलं एक पाऊल आहे. हे अर्थातच दुर्दैवी आहे आणि राष्ट्राच्या हितसंबंधांना मारक आहे, कारण सामाजिक विज्ञानं आणि मानविकी विद्याशाखांमधील गंभीर संशोधन मुख्यत्वे मोजक्या सार्वजनिक विद्यापीठांमध्येच होतं; समाजाविषयीचं वैविध्यपूर्ण आकलन वाढवण्यासाठी असं संशोधन गरजेचं असतं.

संशोधनावर देखरेख ठेवण्यासाठी उचललेली पावलं म्हणजे वाचन, लेखन, कल्पनाशक्ती, स्वप्न, विचार व अभिव्यक्ती या सर्वांसाठी आवश्यक स्वातंत्र्याला बाधा पोचवण्याचे प्रयत्न आहेत. वास्तविक विद्यापीठांमधील संशोधकांना, आणि खरंतर लोकशाहीमध्ये लोकांना हे स्वातंत्र्य असायला हवं. अभ्यासकांनी काय आणि कसा विचार व अभ्यास करावा हे सत्ताधारी सांगणार असतील आणि राष्ट्रवादाच्या स्वतःच्या मर्यादित आकलनापुरताच संशोधनाचा आवाका संकुचित करणार असतील, तर विद्यापीठांमधून केवळ सरकारच्या आणि पर्यायाने कॉर्पोरेट विश्वाच्या हितसंबंधांना पूरक गोष्टींचं उत्पादन होत राहील. प्रस्थापितांना पूरक संशोधन करणं किंवा सत्ताधाऱ्यांनी पुढे केलेल्या एकसाची व एकप्रवाही संस्कृतीला अनुसरणं हे विद्यापीठांचं काम नसतं. उलट, संकल्पनांच्या व जीवनदृष्टींच्या विविधतेशी संवाद साधणाऱ्या, अधिक चांगल्या समाजांच्या कल्पनाचित्राची मांडणी करणाऱ्या, वेगळं राजकारण आणि राष्ट्रवाद व राष्ट्रीयत्व यांच्या विभिन्न संकल्पनांना समजून घेणाऱ्या संशोधनाला जागा देणं, हे विद्यापीठांचं काम आहे.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (३० मार्च व ६ एप्रिल २०१९ या अंकातून)